**अर्जदाराचा उलटतपास गैरअर्जदारातर्फे अॅड. ए.एम.बिराजदार यांच्यामार्फत शपथेवर सुरु–**

०५. माझे शिक्षण सन १९९९ साली दहावीपर्यंत झालेले आहे. मला मराठी लिहता वाचता येते. माझ्या अर्जातील मजकुर मी वाचून पाहिला आहे. माझी व माझ्या वडिलांची, गैरअर्जदार व त्याच्या कुटूंबीयाशी तथाकथित लग्न होण्याच्यापुर्वी ओळख नव्हती. तथाकथित लग्नाची सोयरकी अंबुलगा पौळ येथील पाहुण्यांनी स्थळ आणले होते. तथाकथित लग्नाच्यावेळी माझे वय ३६ वर्षे होते. आता माझे वय ४२ वर्षे आहे. तथाकथित लग्नाच्या वेळेस माझे वय २९ वर्षे होते का हे मला आठवत नाही. माझी जन्मतारीख १५/०४/१९८३ अशी आहे. तथाकथित लग्नाच्या वेळीस गैरअर्जदाराचे वय किती होते हे मला माहीत नाही. सन २०१३ साली गैरअर्जदाराचे वय ४४ होते हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार व माझ्यामध्ये १५ वर्षाचे अंतर आहे. गैरअर्जदार वयाच्या ४४ वर्षी उशीराने का लग्न करतात याची चौकशी वडिलांनी केली असेल, मला माहित नाही. काही अडचणी असल्यामुळे मी इतक्या उशीरा लग्न केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे अगोदरचे सासर तुळजापूर आहे. माझ्या पहिल्या पतीचे नाव सुजित डोंगरे असे आहे. सुजितचे मुळ गाव मंगरुळ आहे. सुजितसोबत माझा रीतसर न्यायालयामार्फत घटस्फोट झालेला नाही.

०६. गैरअर्जदाराला एक मुलगा व एक मुलगी आहे. ते गैरअर्जदारसोबत राहत होते. माझ्या मुळ अर्जात परिच्छेद क्र.३ मध्ये नमुद मजकुर, ''गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र.१ यांच्या नावाने आयकर विभागाकडे आयटीआर भरत होते ज्याचा पॅनकार्ड क्र.FAQPS4758Q या क्रमांकाने आर्थिक उलाढाली होत होत्या'' हा मजकुर माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. माझ्या सरतपासात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार व त्याचे सर्व कुटूंबीय हे भारत सरकारकडे आयकर भरतात. त्या संदर्भात कोणतेही कागदपत्र मला दाखल करता येणार नाही. माझ्या सरतपासात नमुद मजकुर मी गर्भवती असतांना गैरअर्जदार व त्याच्या घरचे तुझा गर्भ खाली कर असे म्हणत होते तेव्हा मी त्यांच्याविरुध्द पोलीस तक्रार किंवा न्यायालयात अर्ज दाखल केला नाही किंवा भरे गावच्या तंटामुक्ती अध्यक्षांच्याकडे सुध्दा तक्रार दाखल केलेली नाही. माझ्या सरतपासात नमुद दि.२२/०८/२०२२ रोजी मला गैरअर्जदार व त्याच्या कुटूंबीयांनी मारहाण केल्याबाबत मी

पोलीस तक्रार केलेली नव्हती किंवा भरे गावच्या तंटामुक्ती अध्यक्षांच्याकडे सुध्दा तक्रार दाखल केलेली नाही. त्या घटनेबाबत वकीलामार्फत नोटीस देखील पाठवलेली नाही. मी हंगरगा येथे सन २०१६ पासून राहते.

०७. प्रश्न –तुमच्याकडे तथाकथित लग्नाचा काही पुरावा नाही ?
उत्तर – लग्नपत्रीका आहे.
लग्नपत्रीका आळंदी येथे छापली होती. साक्षीदार पुन्हा सांगतात लग्न आळंदी येथे झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नपत्रीका कुठेही छापून मिळते. लग्नाचे फोटो व लग्नाच्या खर्चाच्या पावत्या नाहीत. सन २०१६ ते मार्च २०२१ या दरम्यान मी नांदायला जाण्याचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझी हंगरगा येथे वडिलोपार्जित जमीन आहे. त्या जमिनीम माझा हिस्सा आहे. त्या जमिनीच्या संदर्भात दिवाणी दावा क्र.६४१/२०२२ दिवाणी न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.२ ही गैरअर्जदार याच्यापासून जन्मलाचा कोणताही जैविक पुरावा माझ्याकडे नाही. जैविक चाचणी करण्यास माझी काही हरकत नाही.

०८. हे म्हणणे खरे नाही की, माझे व गैरअर्जदार यांचे कधीही लग्न झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराच्या घरी मुलांची काळजी घेणारी मोलकरीण म्हणून कामास होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे व गैरअर्जदार याचे पती–पत्नी म्हणून नाते कधीच नव्हते व नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार यांना त्यांच्या वंदना या पत्नीपासून दोन मुली आहेत हे मोलकरीण म्हणून काम करत असतांना पुर्वीपासूनच मला माहीत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी गैरअर्जदाराच्या घरी मोलकरीण म्हणून राहत असल्यामुळे त्यांच्या घराची संपुर्ण माहिती मला होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या गोष्टीचा गैरफायदा घेऊन मी त्यांची पत्नी असल्याचा बनाव करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बेकायदेशीर रीत्या पोटगी वसुल करण्याकरीता मी हा खोटा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार व त्यांच्या कुटूंबीयांच्या विरुध्द दिवाणी व फैाजदारी केसेस त्यांना अडकवण्याच्या हेतुने दाखल केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराचे घर सन २०१५ मध्ये सोडून निघुन आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे गैरअर्जदारासोबत लग्न झाले नाही, आमच्यामध्ये कोणतेही वैवाहीक संबंध नाहीत व आमच्यामध्ये कोणतेही नाते नाही. हे म्हणणे

खरे आहे की, अर्जदार क्र.२ ही माझ्या व गैरअर्जदार यांच्या संबंधातून जन्मलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला व अर्जदार क्र.२ हिला पोटगी मिळण्याचा संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा अर्ज, खोटे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2025.11.27 11:28:41 +0530

(श्रीमती.के.पी.गाडे)

दिनांक–२५/११/२०२५.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,

निलंगा